# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.07.2025** **वार- शनिवार**

---

**कारगिल दिवस**

करगिल युद्धातील भारताच्या ऐतिहासिक विजयाच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त दक्षिण कमांड मुख्यालयानं कारगिल विजय दिवस मोठ्या अभिमानानं आणि देशभक्तीच्या उत्साहानं साजरा केला. दक्षिण मुख्यालयाचे जनरल ऑफिसर चीफ लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्यासह इतर प्रमुखांनी शहिदांना श्रद्धांजली वाहिली. भारतीय सैन्याच्या शौर्याची,धैर्याची आणि बलिदानाची आठवण म्हणून करगिल विजय दिवस साजरा करण्यात येतो.

**हिंजवडी कोंडी**

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान क्षेत्र हिंजवडी परिसरासह माण, म्हाळुंगे, सूस या भागातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीनं कराव्यात, मेट्रोची सुरु असलेली कामं गतीनं पूर्ण करावीत, विविध विकास कामं आणि रस्त्याची कामं करताना स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिकांना विश्वासात घेऊन वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. आकुर्डी इथल्या पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालय इथं आयोजित बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

**हिंजवडी प्रश्न**

**<u>हिंजवडीच्या अडचणी सोडवण्यासाठी गेले कित्येक महिने मागणी करत असून</u>** सरकारला विनंती आहे की या समस्या सोडवा अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. या संदर्भात महाराष्ट्र सरकारला पत्र लिहिल असल्याचं त्यांनी आज पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

**प्रत्यारोपण**

हृदय, मूत्रपिंड, यकृत यांसारख्या अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी रुग्णांना १० ते २० लाख रुपयांपर्यंत करावा लागणारा खर्च आता महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अत्यल्प दारात किंवा मोफत उपलब्ध होणार आहे. प्रत्यारोपणासाठी रुग्णालयांना 5 लाख रुपयांचे पॅकेज दिले जाणार आहे, याव्यतिरिक्त लागणारा **अतिरिक्त** खर्चही विशेष निधीतून भरला जाणार असल्याचं राज्य सरकारतर्फे सांगण्यात आलं आहे.

**भीमाशंकर जादा गाड्या**

श्रावण महिन्याच्या निमित्तानं भीमाशंकर इथं भाविक दरवर्षी मोठ्या प्रमाणात दर्शनाला येतात त्यासाठी एसटीच्या पुणे विभागाकडून भीमाशंकर साठी **अतिरिक्त** गाड्या सोडण्याचं नियोजन करण्यात आलं आहे. शिवाजीनगर,खेड, मंचर डेपोतून एकूण ८० जादा गाड्या सोडण्यात येणार असल्याचं पुणे विभागाचे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितलं.

**द्राक्ष भूषण पुरस्कार**

ग्रेप ग्रोवर्स फेडरेशन ऑफ इंडिया, पुणे आणि नॅशनल रिसर्च सेंटर फॉर ग्रेप्स्, पुणे यांच्या वतीनं देण्यात येणाऱ्या द्राक्ष भूषण या राष्ट्रीय पुरस्कारासाठी कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष कृषिरत्न अनिल घमाजी मेहेर यांची निवड झाली आहे. **उद्या विजयापूर इथं** बेदाणा उत्पादन आणि प्रक्रिया - सद्यस्थिती या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केलं आहे.या वेळी होणाऱ्या कार्यक्रमात या पुरस्काराचं वितरण करण्यात येणार आहे.

**झाडणकाम**

पुणे महापालिका आयुक्तांनी शहर स्वच्छतेसाठी विविध उपाययोजना सुरू करतानाच रात्रपाळीतही झाडणकाम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी नव्याने 500 कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्याचे आदेश दिले आहेत. रात्री होणाऱ्या झाडकामामुळे ओला आणि सुका मिश्रित कचरा वाढल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे.

**चितळ मृत्यू**

राष्ट्रीय लाळ खुरकत संशोधन केंद्र यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार पुण्यातील राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांना लाळ खुरकत या विषाणुजन्य आजाराचं संक्रमण झाल्याचं निदान करण्यात आलं असल्याची माहिती पुणे महापालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने देण्यात आली. या प्राणी संग्रहालयात १६ चितळाचा मृत्यू झाला होता.

**पर्यटन कार्यशाळा**

पर्यटन विकास स्थानिक अर्थ वृध्दी या उपक्रमासाठी सातारा इथ 31 जुलै रोजी पर्यटन विकास कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं असून इच्छूकांनी या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयात नाव नोंदणी करावी असं आवाहन पुणे विभागीय पर्यटन कार्यालयाच्या उपसंचालक शमा पवार यांनी केलं आहे.

**कार्यशाळा**

विद्या प्रतिष्ठान पॉलिटेक्निक, इंदापूर इथं यशस्वी समूह आणि आयबीएमच्या माध्यमातून “कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कौशल्य विकास” कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देत त्यांना उद्योग जगतातील स्पर्धेसाठी सक्षम बनवण्याचा उद्देश होता.

**गुणवंत सत्कार**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील दहावीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव महापालिकेच्या वतीनं प्रत्येकी एक लाख रुपयांचा धनादेश देऊन आज उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. शालेय उपक्रमांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रकल्पांचा समावेश करून प्रशिक्षण अधिक अद्ययावत आणि गुणवत्तापूर्ण करावं, असं मत पवार यांनी यावेळी मांडलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून ढगाळ हवामान असून हलक्या ते मध्यम पावसाच्या सरी पडत आहेत. आज कमाल तापमान २६ अंश तर किमान तापमान २२ पूर्णांक २ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. उद्यासुद्धा हवामानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**